सक्षम प्राधिकारी क्र.३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स ॥, सेनापती बापट रोड, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/५०५/२०२३
दिनांक १०/०७/२०२३

## "प्राथमिक पात्रता यादीचे जाहीर प्रकटन"

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे 'उक्त अधिनियम' असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे" या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांनी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.१०० पैकी, सि.स.नं. ६६१३/३ पैकी विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ३३२६०.९८ चौ.मी. ह्या क्षेत्रातील (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी क्र.सप्रा/झोपुप्रा-३/५२०/२०२२, दि.१२/०५/२०२२ रोजीच्या प्राथमिक सर्व्हेक्षणाचे जाहीर प्रकटनानुसार दि.२५/०५/२०२२ रोजी प्राथमिक सर्व्हेक्षण करणेत आले होते.; आणि

ज्याअर्थी, या प्रकटनास अनुसरुन शासनाच्या निर्णय व आदेशान्वये उक्त झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांची पात्रता यादी तयार करणेकरीता झोपडीधारकांनी त्यांची निवासी / बिगरनिवासी / संयुक्त वापराबाबतचे जोडपत्र ३/४ व पुराव्यांसह कागदपत्र सादर करणेबाबत कळविणेत आले असून, सदरच्या झोपडीधारकांचे उक्त जोडपत्र व पुराव्यांसह कागदपत्रे प्राधिकरणास प्राप्त झाले आहेत.

त्याअर्थी, प्राप्त झालेल्या जोडपत्र व त्यासोबतचे प्रपत्र आणि पुराव्यांची छाननी करुन खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका स.नं.१०० पैकी सि.स.नं. ६६१३/३ पैकी विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे या अंदाजे क्षेत्रफळ ३३२६०.९८ चौ.मी. क्षेत्रातील झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी परीशिष्ट-२ तयार करण्यात आली असुन, सदरची यादी या जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

या प्राथमिक पात्रता यादीबाबत हित संबंध असलेल्या व्यक्तींनी त्यांची हरकत / दावा /सूचना / आक्षेप लेखी स्वरुपात व योग्य पुराव्यांसह सदरचे प्रकटन प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे मुथ्था चेंबर्स ॥, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६ या ठिकाणी दाखल करावी. अशा प्रकारे दाखल करणेत आलेल्या हरकती/ दावे/ सूचना / आक्षेप बाबत संबंधितांना वाजवी म्हणणे मांडण्याची संधी देणेत येईल. अर्जदारांचे म्हणणे व पुराव्यांची पडताळणी करुन, तसेच आवश्यक तर स्थळपाहणी करुन सदरची प्राथमिक

पात्रता यादी अंतिम करणेत येईल. तसेच उपरोक्त पात्रता यादीतील दि.१६/०५/२०१८ रोजीच्या शासननिर्णयानुसार सशुल्क पुनर्वसनाकरीता पात्रता करण्यात आलेल्या झोपडीधारकांनी दि.१६/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २००० पूर्वीचे कागदपत्रे / पुरावे सादर केल्यास त्याचा सन २००० नुसार मोफत पुनर्वसनाकरीता अंतिम पात्रता यादीमध्ये पात्र समावेश करता येईल.

**झोपडपट्टीचे नाव :- स.नं.१०० पैकी सि.स.नं. ६६१३/३ पैकी विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे**
**महानगरपालिकेचे नाव :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

अनुसूची

| गाव | जागेचा तपशील | विकसकाचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (मोजणी नकाशानुसार रस्त्याअंतर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| विठ्ठलनगर, पिंपरी वाघेरे, पुणे | स.नं.१०० पैकी सि.स.नं. ६६१३/३ पैकी | मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स | ३३२६०.९८ चौ.मी. | **पुर्वेस** - लागू मौजे भोसरीची शीव, नाला |
| | | | | **पश्चिमेस** - स.नं.१००पै, सि.स.नं.६६१३/३पै, १२.० मी. डि.पी.रोड |
| | | | | **दक्षिणेस** - सि.स.नं.६५५१,६५५२, ६६०९(पै), ६६१२, १२.० मी. डि.पी.रोड |
| | | | | **उत्तरेस** - अण्णासाहेब मगर स्टेडियम, स.नं.१००पै, सि.स.नं.६६१३/३पै, |

स्थळ:- झो.पु.प्रा. पुणे
दि:१० /७/२०२३

10.07.23
**उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.**